*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. XIV / Issue – III* *ISSN 2277-8063*

# एकात्म मानवतावाद विचारांची समकालीन प्रस्तुतता

**डॉ.प्रमोद जगन्नाथ पाटील** सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग माऊली महाविद्यालय, वडाळा (सोलापूर)
भ्रमणध्वनी-9552529337 Email -pramod24patil@gmail.com

---

**प्रस्तावना-** मानव समाजशील प्राणी आहे. मानवी गरजेतून समूह निर्मिती, समूहातून समाज निर्मिती झाली. मानवाने मानवाने समाज उन्नतीसाठी विविध टप्प्यांवरती विविध सामाजिक, राजकीय संस्था निर्माण केल्या. या संस्थांना अधिमान्यता लाभण्यासाठी विविध राजकीय विचारसरणीची मांडणी करण्यात आली. या विविध राजकीय विचारसरणींमध्ये अंतर विरोध असल्याचे आपणास मानवविद्या शाखेच्या अभ्यासावरून स्पष्ट होते. एकीकडे विश्वबंधुत्वाची, विश्वनागरीतत्त्वाची भाषा, दुसऱ्या बाजूला धार्मिक जातीय वांशिक विद्वेषाची भाषा, एकीकडे स्त्रीमुक्तीची भाषा तर दुसरीकडे कौटुंबिक हिंसाचार मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. एकीकडे शोषित वंचितांसाठी सामाजिक न्यायची भाषा तर दुसऱ्या बाजूला शोषित वंचित घटकांवरती अत्याचार मोठ्या प्रमाणात वाढत चालले आहेत अशा परस्पर विरोधी प्रक्रिया समाजामध्ये चालत असतात. राजकीय व्यवस्थेतील राजकारणाचे तसेच समाजातील विविध वर्गांचे आणि घटकांचे परस्पर संबंधांचे आकलन आपणा राजकीय विचारसरणीच्या आधारे आपणास होत असते. राजकीय विचारसरणी ही श्रद्धा व मूल्य याच्या आधारे उभा असते. विशिष्ट मूल्यांचा आग्रह आणि श्रद्धांचा पुरस्काराबरोबरच प्रत्येक विचारसरणी ही माणसाला जीवनदृष्टी तसेच विश्वदृष्टी देखील दाखवत असते. मानवविद्या शाखा अंतर्गत या सर्व प्रक्रियेकडे तटस्थपणे, वस्तुनिष्ठपणे विश्लेषणात्मक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक ठरते. भारतीय राजकीय विचार परंपरेमध्ये विविध विचार प्रणालींची मांडणी झालेली आहे. भारतीय विचार परंपरेत अस्तित्व, वेगळेपण सिद्ध करण्याच्या दृष्टिकोनातून भारतीयत्वाच्या आधारे कौटिल्यापासून विनोबा भावे, जयप्रकाश नारायण यांच्यापर्यंत विविध विचार प्रणालीची मांडणी करण्यात आली.भारतीय राजकीय विचार प्रणाली समृद्ध करण्यामध्ये अनेक विचारवंतांनी योगदान दिले. त्या आधारे समाज रचनेला व राज्यसंस्थेला नवे आयाम देण्याचा प्रयत्न केला, नवसैद्धांतिक मांडणी केली. श्रद्धा,मूल्य,जीवनदृष्टी या आधारे प्रत्येक विचारसरणी ही प्रस्थापित व्यवस्थेतील अपूर्णता दाखवत असते. या पूर्णतः दोष दूर करून नवव्यवस्था निर्माण केली पाहिजे असे विचार प्रवर्तकांना अपेक्षित असते. प्रा.सुमंत यांच्या मते, विचारसरणी ही माणसाला 'युटोपिया' ध्येय स्वप्न देत असते. माणसाला बदल हवे असतात कोणतीही व्यवस्था कधीच परिपूर्ण नसते, परिणामतः व्यवस्थेतील दोष समजावून घेणे आवश्यक आहे. विचारसरणी वास्तवाचे विश्लेषण करून माणसाची बौद्धिक भूक भागवत असते, तसेच ती नागरिकांना ठोस कार्यक्रम देऊन कृतीला प्रवृत्त करत असते. विविध राजकीय आर्थिक कार्यक्रमांद्वारे विचारसरणी माणसाची क्रियाशीलतेची गरज भागवते म्हणून विचारसरणीमध्ये मानवी समूहांना हलवण्याची जबरदस्त ताकत असते. मानसे विचारसरणीने झपाटतात, कृतिशील होतात. संघर्षाला तयार होतात. त्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची त्यांची तयारी असते. राजकीय हस्तक्षेपासाठी मास मोबिलायझेशन करण्यासाठी विचारसरणीची आवश्यक असते. विचारसरणी भिन्नभिन्न दृष्टिकोनातून मांडण्यात आलेली असते. संबंधित विचारसरणीची इष्ट अनिष्टता, पुरोगामीत्व, प्रतिगामीत्व, मुक्तीदायी आणि वैचारिकअंधत्व, नववदृष्टी दाखवणारे स्वरूप असे देखील असू शकते. विचारसरणीमध्ये स्थितीवादी,परिवर्तनवादी,पुरोगामी,प्रतिगामी,उजवी डावी,मध्यम मार्गी अशी देखील असू शकते.[1] (सुमंत.(2018) पृष्ठ क्र.15) अशा विचारसरणींचा अभ्यास करणे आवश्यक असते. या विचार प्रणालीतील एकात्म मानवतावाद या विचारसरणीची मांडणी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी केली. सदर विचारसरणीची समकालीन कालखंडातील प्रस्तुतता व मान्यता वाढण्याची कारणे शोधण्याच्या उद्देशाने सदर संशोधन पेपरची मांडणी करण्यात आली आहे.

**संशोधन गृहितकः-**

1) पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी भारतीय विचारांवर आधारित मानवी कल्याणाच्या दृष्टिकोनातून एकात्म मानवतावाद विचारसरणीची मांडणी केली.

2) पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवतावाद विचारसरणीच्या मांडणीमध्ये भारतीय संदर्भात भांडवलशाही आणि समाजवाद या आर्थिक विचारसरणी कशा अपूर्ण आहेत याचे विश्लेषण करतात.

3) एकात्म मानवतावादाच्या आधारे पंडित दीनदयाळ उपाध्याय भारतीय लोकशाहीला स्थिरता व भारतीय विचाराच्या आधारे विकास करण्याचा प्रयत्न करतात.

**संशोधनाची उद्दिष्टे-**

1) पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेल्या एकात्म मानवतावाद विचारसरणीचा अभ्यास करणे.

2) एकात्म मानवतावाद संकल्पनेचे स्वरूप समजावून घेणे.
3) पाश्चिमात्य विचारसरणी पेक्षा एकात्म मानवतावादाचे कोणते भिन्नत्व आहे. ते जाणून घेणे.

**संशोधन पद्धत :-** सदर संशोधन पद्धतीमध्ये ऐतिहासिक तुलनात्मक ग्रंथालयीन, विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. ग्रंथालयीन संदर्भ ग्रंथ तसेच प्राथमिक व दुय्यम साधनांचा संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

**विषयप्रवश-**

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी 11 मार्च 1959 रोजी लखनऊ येथील गंगाप्रसाद मेमोरियल हॉलमध्ये भाषण दिले. या भाषणांमध्ये पाश्चात्य विचारांचे खंडन करून वसाहतवाद विरोधी अर्थशास्त्र व मानवतावाद यावर त्यांनी एक प्रबंध सादर केला. या भाषणात त्यांनी सामाजिक, आर्थिक, हुकूमशाही विचारांना प्रत्युत्तर म्हणून मांडण्यात आलेल्या विचार प्रणालीचे वर्णन 'मानवतावाद' या शब्दाच्या आधारे केले. त्यानंतर दीनदयाळ उपाध्याय यांनी 2 जानेवारी 1961 'पाञ्चजन्य' मासिकाच्या अंकात 'समाजवाद, लोकशाही की मानवतावाद' या शीर्षकाखाली एक लेख लिहिला, हा लेख ज्यावेळेस प्रकाशित झाला त्यावेळेस 'मानवतावाद' या संज्ञेचा उपयोग करावा का नाही.? हे निश्चित ठरलेले नव्हते, त्यामुळे हा लेख ज्यावेळेस 'राष्ट्रीय विचार' या पुस्तकात संकलित करण्यात आला तेव्हा त्या लेखाचे शीर्षक बदलून 'समाजवाद लोकशाही आणि हिंदुत्व' असे ठेवण्यात आले. 11 ते 15 ऑगस्ट1964 दरम्यान दीनदयाळ उपाध्याय यांनी वलसाड येथील भारतीय जनसंघाच्या प्रशिक्षण शिबिरात 'तत्वे आणि धोरण' हा लेख सादर केला. ज्यामध्ये त्यांनी आपल्या पक्षाच्या विचारधारेला 'एकात्म मानवतावाद' असे संबोधले.

**एकात्म मानवतावाद विचारसरणीची मूलभूत तत्व-**

**1) भारतीयत्वाची ओळख: -** दीनदयाळ उपाध्याय यांनी मानवतेच्या धर्माचे वर्णन एकात्म मानवतावादात केले आहे. पाश्चात्य जगतामध्ये मानवाला देवाच्या विरोधात उभे केले आणि नंतर त्याला यांत्रिकी म्हणून पाहिले, परंतु उपाध्याय, एक स्वयंपूर्ण आणि संवेदनशील अस्तित्व एकात्म मानवतावादात उभे करतात. एकात्मतेचे तत्त्व मानव आणि विचारप्रणाली या दोन्हींचे भारतीय करण करण्यात आले आहे. एकात्म मानवतावाद तत्त्वज्ञानात प्रामुख्याने मानव जात व विविध समुदाय समाजामधील संबंधांचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे. एकात्मता म्हणजे 'जसे शरीर तसे शरीर' या तत्त्वावर समाजाची निर्मिती होणे,म्हणजे जे शरीरात आहे ते शरीरातही असते ,ही भारतीयत्वाची ओळख जगभर प्रचलित झाली आहे. भाग आणि संपूर्ण हे मुलत: एकच आहेत. या मूलभूत तत्वाच्या आधारे अद्वैत तत्त्वज्ञानावर एकतेची संकल्पना निर्माण झाली आहे.

'शरीरात' जे आहे ते 'शरीरात'च आहे, ही भारतीय तत्त्वज्ञानाची एक जुनी धारणा आहे. 'भाग' आणि 'पूर्ण' हे मूलतः एकच आहेत, हे या तात्विक तत्त्वाचे सार आहे. यातूनच 'एकत्व' किंवा 'अस्तित्वहीनतेचे' तत्त्वज्ञान उदयास आले. संपूर्ण सजीव आणि निर्जीव विश्वातील एकत्वाची संकल्पना हे भारतीय तत्त्वज्ञानाचे वैशिष्ट्य आहे. 'जे विश्वात आहे ते विश्वातच आहे.' या व्याख्येनुसार, विश्व हे अनेक लहान घटकांची बेरीज नाही, आणि सूक्ष्म हे विश्वाचा एक लहान तुकडा नसून त्याची एक छोटी प्रतिमा आहे. झाड विशाल आहे, तर बी सूक्ष्म आहे. झाड आपल्या सर्व विशालतेसह बीमध्ये सामावलेले आहे, सूक्ष्म, बी, विशाल, व्यक्ती व समाज, तसेच मानव व समाज यांच्यात कोणताही भेद नाही. एकत्वाची एक भावना आहे, जी जीवनाला तुकड्यांमध्ये विभागत नाही, ती खंडित दृष्टी देत नाही, तर एक समग्र दृष्टी देते.

पंडित दीनदयाळ सर्व जीवसृष्टी आणि संपूर्ण सृष्टीला आपली निर्मिती मानत असत, आणि आत्म्याला ईश्वराचा अंश, तसेच सर्व सजीवांना ईश्वराचा अंश मानत. त्यांच्या मते, जग हे एक बाह्य वातावरण आहे, ज्याचा अनुभव आपण आपल्या इंद्रियांद्वारे शारीरिकरित्या घेतो. त्यांच्या मते, संपूर्ण सृष्टी परमेश्वराने निर्माण केली आहे. याचे स्पष्टीकरण व्यक्तीच्या अनुभवाच्या आधारावर दिले जाऊ शकते. त्यांचा असा विश्वास होता की, जगातील इतर प्राण्यांपेक्षा मानव अधिक उत्क्रांत आहे. त्यांचे अस्तित्व केवळ मूलभूत शारीरिक गरजांच्या पूर्ततेवर अवलंबून नसते. त्यांच्या जीवनात भौतिक आणि आध्यात्मिक दोन्ही घटकांचा समावेश असतो. मुक्तीच्या बाबतीत, पंडितजींचा असा विश्वास होता की, मुक्ती कधीही वैयक्तिक नसते, ती एकात्म असते. त्यांच्या मते, मानवता हाच मानवजातीचा धर्म आहे. त्यांची धर्मावर अढळ श्रद्धा होती. ते खऱ्या मानवी धर्माचे अनुयायी होते. पंडितजी जीवनाच्या एकतेवर विश्वास ठेवत होते. ते जीवनाला कोणत्याही आधारावर तुकड्यांमध्ये विभागलेले पाहत नव्हते. त्यांचा विश्वास होता की धर्म, जात, स्थळ आणि काळ यांतील भेद असूनही मानवी जीवनात एकता आहे आणि सर्व मानवी जीवन एकच स्वरूप दर्शवते.

पंडित दीनदयाळ भारतीय संस्कृतीचे खंदे समर्थक होते. त्या आधारावर, त्यांनी आपल्या विचारांमध्ये समानतेच्या कल्पनेला प्रोत्साहन देत एकात्मतावादी तत्त्वज्ञान मांडले. उपाध्याय यांच्या मते, मानवी जीवनात विविधता असली तरी, त्यातील मूळ

एकता शोधण्यासाठी त्यांनी एकतेवर भर दिला आहे. उपाध्याय यांनी आपल्या एकतेच्या तत्त्वज्ञानात मानवाचे अस्तित्व स्वीकारले आहे आणि मानवाला ईश्वराचा अंश मानले आहे. उपाध्याय यांनी दुःखी आणि दुर्बळ लोकांनाही ईश्वराचा अंश मानले आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या मते, प्राचीन भारताचे जेथे जात,धर्म, परंपरा चालली रीती इतक्यादि मध्ये भेद जरी असले तरी प्रत्येक बाबतीत एकतेची भावना स्पष्टपणे दिसते.

**2) एकात्मतेसाठी संघटनेची आवश्यकता-** पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या मते, समाजाला सुखी वैभव संपन्न आणि प्रगत बनवण्यासाठी संघटनेची आवश्यकता असते. राष्ट्र जीवनात सन्मान जनक स्थिती शक्तीशिवाय येऊ शकत नाही, शक्ती संघटने शिवाय येऊ शकत नाही म्हणून शक्ती प्राप्त करण्याच्या उद्देशाने प्रत्येकाने संघटित काम केले पाहिजे. समाजाची संघटित अवस्था हीच समाजाची स्वाभाविक अवस्था आहे. संघटनेचा अभाव ही समाजाच्या स्वाभाविक शक्तीच्या अभावाचे प्रतीक आहे. विखुरलेल्या लोकांच्या समूहाला समाज म्हणता येत नाही. उपाध्याय यांच्या मते, ज्याप्रमाणे विखुरलेले मातीचे कण एकरूप होत नाही तोपर्यंत ती वीट बनू शकत नाही, जर मातीचे वेगवेगळे कण असतील तर त्यांच्यात शक्ती नसते. त्यांच्याकडून कोणतेही राष्ट्रनिर्माणाचे कार्य होऊ शकत नाही. मातीच्या कणांना धुळीला सर्वजण तुडवून जातात म्हणून सामूहिकता ही समाजाची स्वाभाविक अवस्था आहे. 'आपण सर्वजण एक आहोत.' ही भावना प्रत्येकाच्या तेव्हाच शक्य आहे की, आपल्याला बनवणाऱ्या आपल्याला जोडणारे घटक कोणते आहेत याची आपणाला जाणीव असेल. थोडक्यात उपाध्याय असे स्पष्ट करतात की, मानवी जीवनात विविधता असली तरी मूळ एकता शोधण्यासाठी एकतेवर भर दिला पाहिजे.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या मते, भारताची सांस्कृतिक प्रतिमा इच्छित ध्येये साध्य करण्यासाठी आवश्यक पाया पुरवते. या पायाअभावी, लोकशाही केवळ एक बाह्य स्वरूप आणि एक पोकळ संस्था बनते. आत्म्याशिवाय संस्थात्मक शरीर निरुपयोगी ठरते. म्हणून, केवळ भारताच्या विकासाची दिशा ठरवण्याच्या दृष्टिकोनातूनच नव्हे, तर मानवी विचार आज जिथे पोहोचला आहे तिथून पुढे जाण्याच्या दृष्टिकोनातूनही, आपण भारतीय संस्कृतीच्या साराचा विचार केला पाहिजे. या मूलभूत सत्यांचा, राष्ट्रीय आणि कालिक अशा दोन्ही स्तरांवर, भारतीय संदर्भात केलेला उपयोगच आपल्या प्रगतीची दिशा ठरवेल. भारतीय विचार परंपरेमध्ये संपूर्ण मनुष्य जीवनाचे वर्तमान, भूत भविष्य या सर्वांना एकत्रित करून पूर्णत्वाचे दर्शन होते. आपला केंद्रबिंदू पूर्णतः आहे. आपल्या विचारांचा आधार एकता आणि संघत्व आहे, इतर लोकांचा आधार एकांगी आहे.

**3) व्यक्तीस्वतंत्र नसतो, समाज नियमांनी बांधलेला असतो.-** पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या मते, पाश्चात्य राष्ट्रांमध्ये व्यक्ती मोठी की समाज? या प्रश्नाचे उत्तर संदर्भात व्यक्ती स्वतंत्र आहे असे देण्यात येते. परंतु भारतीय विचार परंपरेमध्ये व्यक्ती स्वतंत्र मानण्यात आलेली नाही. व्यक्ती एकटी राहू शकत नाही त्याचे खाणे-पिणे, उठणे- बसणे सर्व इतरांवर अवलंबून आहे. जसजशी विज्ञानाची प्रगती होत आहे, तसतसे व्यक्तीचे इतरांवरती अवलंबित्व अधिक वाढत आहे. शेतकरी धान्य पिकवतो मात्र त्याला कपड्यांसाठी किंवा इतर बाबींसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते. व्यक्ती जन्माला आल्यानंतर त्याला चालणे, बोलणे,खाणे,वाचणे हे सर्व दुसऱ्यांकडून शिकावे लागते. व्यक्तीचे सुख आनंदही इतरांवर अवलंबून असतो. एकट्याने खाण्या फिरण्यात त्याला आनंद मिळत नाही. त्याच्या आनंदात व दुःखातही त्याला इतरांची साथ असावी लागते. भौतिक सामाजिक अशा सर्व दृष्टिकोनातून व्यक्ति इतरांवर अवलंबून आहे. त्यामुळे व्यक्ती स्वातंत्र्य ही पोकळ घोषणा आहे. थोडक्यात व्यक्ती हा नियमाने बांधलेला आहे. व्यक्ती समाजापासून स्वतंत्र नाही,अशी भूमिका दीनदयाळ उपाध्याय घेतात.

**4) पाश्चात्त्य संस्कृती शोषणावर आधारलेली आहे तर भारतीय संस्कृती सहयोगावर आधारलेली आहे.-**पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या मते, पाश्चात्य विचार समाज, निसर्गसृष्टी या सर्व गोष्टी स्वतःसाठीच आहे, म्हणजे व्यक्तीसाठी आहे असे मानणारा आहे. निसर्गातील सर्व उपलब्ध साधने व्यक्तीसाठीच आहेत आणि व्यक्तीने त्याचा उपभोग घेतला पाहिजे अशी पाश्चात्य संस्कृती मानते. पाश्चात्य संस्कृती निसर्ग विजयाची भाषा करतात. मात्र भारतीय संस्कृतीमध्ये 'जो सर्वांसाठी आहे,जो सर्वांची सेवा करतो तोच मोठा.'असे मानण्यात आले आहे.


**5) समाजवाद, भांडवलशाही स्पर्धात्मकतेवरती आधारलेल्या व्यवस्था-** स्पर्धात्मकतेच्या व जिंकण्याच्या अहंकारातून भांडवलशाही व समाजवाद या विचारसरणीचा जन्म झाला आहे असे पंडित दीनदयाळ उपाध्याय मानतात. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या मते, समाजवाद आणि भांडवलशाहीच्या पाश्चात्य विचार प्रणालींमध्ये माणूस केवळ एक आर्थिक घटक मानण्यात आला आहे हा दृष्टिकोन अपूर्ण आणि खंडित आहे त्यामुळे एकतर्फी विचार निर्माण झाला आहे. समाजवाद विचारसरणी ही व्यक्तीवादच आहे. समाजवादी विचारांमध्ये समाजाची कल्पना नसून मस्साराची भावना आहे.

मजुराला एकत्र आणून त्या मजुरांचे स्वातंत्र्य देखील संपुष्टात आणले जाते व हुकूमशाही प्रस्थापित केली जाते, येथे समाजाची वास्तविक भावना नसून व्यक्तिवादी विचार आहे. ज्यामुळे पुढे जाऊन व्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेतले जाते ही विचारधारा संघर्षावर आधारित आहे. भांडवलशाही विचारात ही संघर्ष आहे, स्पर्धा हा त्याचा आधार आहे. भांडवलशाही 'बळी तो कान पिळी' या विचारांवर आधारित आहे. साम्यवादी स्पर्धेवर नव्हे तर वर्ग संघर्षावर विश्वास ठेवतो. समाजवाद वर्गा वर्गात स्पर्धा एक प्रकारे मान्य करतो. या सर्वांवरून पश्चिमेकडील विचार परिपूर्ण नसून तो तुकड्या तुकड्यांवरती आधारलेला आहे तो अपूर्णतेचा विचार आहे.भारतीय विचार परंपरा सहयोगावर आधारलेली आहे. कमकुवत व्यक्ती देखील भारतीय परंपरेत जिवंत राहतो. कमकुवत व्यक्तीचे देखील संरक्षण करणे हे भारतीय विचार परंपरेचे महत्त्वाचे लक्षण आहे. भारतीय संस्कृतीत माणसाच्या आर्थिक गरजांबरोबर त्याच्या आध्यात्मिक आणि मानसिक गरजांकडे देखील लक्ष दिले आहे. भारतीय संस्कृतीमध्ये संघर्षाला इर्षा, द्वेषभावनेला स्थान नाही. भारतीय विचार परंपरेत सदगुणाचा विचार आहे अस्पृश्यता जातीपाती इत्यादी अनेक दुर्गुण जरी असले तरी ते आम्ही पुसून टाकण्याचा प्रयत्न करीत आहोत.

**6) एकात्म मानवतावाद या संकल्पनेला भावात्मक दृष्टिकोनातून पाहतात.** पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या मते, राष्ट्र कल्पनेला केवळ नकारात्मक दृष्टिकोनातूनच पाहिले जाते. जेव्हा जेव्हा युद्धाची परिस्थिती निर्माण होते तेव्हा राष्ट्र जिवंत होतात. युद्धाच्या वेळेस राष्ट्रातील लोक एकत्रित येतात मात्र आपण केवळ युद्ध आणि विपत्ती या कालखंडातच एकत्र या भावनेने जगतो, या ऐवजी आपण भावात्मक आधारावरती उभे आहोत,जीवनाची एक दृष्टी आपल्यासमोर आहे, आपण जगात जन्माला आले ते कोणाचा विरोध करण्यासाठी नाहीतर आपल्यासमोर एक विधायक विचार आहे की, आपण जोडणारे आहोत तोडणारे नाही. आपल्याला जोडणारी गोष्ट म्हणजे संस्कृती होय. हिंदू संस्कृती किंवा भारतीय विचारांवर विश्वास ठेवून आपण कार्य केले पाहिजे. पाश्चात्य विचारांमध्ये जगाकडे पाहण्याची एकल दृष्टी आहे. त्याच विशिष्ट चष्म्यातून सर्व प्रश्नांची उत्तरे शोधली जातात. भारतीय जीवनाच्या संपूर्ण अंगाकडे पूर्ण स्वरूपात पाहतात. पंडित दीनदयाळ उपाध्याय या ठिकाणी जैन परंपरेतील अनेकांन्तवाद किंवा स्याव्दाद संदर्भ तसेच पाणिनी महाभाष्यात याला 'गज-अंध-न्याय' असे म्हटले आहे. पूर्ण ज्ञान हे प्रज्ञेद्वारेच येते त्यासाठी मनुष्याने जीवनाचे वर्तमान,भूत आणि भविष्य या सर्वांना एकत्रित करून पूर्णत्वाचे दर्शन जाणून घेतले पाहिजे.

7) **जीवनाचा पाया समानता नसून एकात्मता -** पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या मते, पाश्चात्य व भारतीय संस्कृतीतील फरक म्हणजे दीनदयाळ यांच्या मते, पाश्चिमात्य विचारसरणी ही व्यावहारिक आहे, ती राज्य, राष्ट्र, धर्मसत्ताक, मानवतावादी, हुकूमशाही, सामाजिक व्यवस्था, समाजवाद, भांडवलशाही आणि शोषण यांवरील चर्चा आहे. त्यामुळे ती मानवाच्या सदसद्विवेकबुद्धीचे प्रतिनिधित्व करते, असे नाही. पाश्चात्य विचारसरणी भौतिकवादी आहे. पाश्चात्य विचारसरणी मानवाला वैयक्तिक सत्ता आणि अधिकारासाठी यंत्रासारखे बनवते. मानवी स्वभावाचे शोषण करते याचा परिणाम समाजात असा होतो की, परस्पर विरोधी आदर्श आणि प्रेरित झालेले संघर्षशील वर्ग हिंसक अधिग्रहण आणि प्रति ग्रहणात गुंततात. भौतिकवादातून वस्तू आणि सेवांच्या सततच्या पूर्ततेसाठी तीव्रस्पर्धा निर्माण होते. त्यामुळे अंतर्गत तणाव आणि अंतर्गत फूट आणि दुही निर्माण होते.

**8) एकात्म मानवतावाद (एकात्म जीवनदर्शन) -** पाश्चात्य विचारसरणीमध्ये कुटुंब, समाज, मानवतेचे विश्लेषण करताना पाश्चात्य विचारसरणीमध्ये भिन्न भिन्न वर्तुळे मानण्यात आलेली आहेत. व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र, मानवता ही वर्तुळे परस्पराच्छादित असून भिन्न आहेत आणि एकमेकांपासून उत्पन्न होत नाहीत, असे पाश्चात्य विचारसरणीमध्ये मांडण्यात आले आहे. सतत वाढणारी वर्तुळाकार निर्मिती आहे याची सुरुवात व्यक्तीपासून होते आणि, व्यक्तीच्या बाबतीत, व्यक्तीशी असलेले नाते न तोडता, ते नाते न टिकवता, कुटुंबाचे एक वेगळे वर्तुळ आहे. त्याचे तुकडे न करता, त्याच्याशी संबंधित दुसरे वर्तुळ राष्ट्राचे आहे. त्याच्या वरील वर्तुळ मानवतेचे आहे, आणि सर्वोच्च बिंदूवर सजीव आणि निर्जीव जगाचे वर्तुळ आहे.[2] दीनदयाळ उपाध्याय (2014) पृष्ठ क्र. 39-40 हे खालील आकृतीमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.




समकेंद्री प्रणाली आकृती [3]राहुल कुमार (2024) (पाश्चात्य विचारसरणीवर आधारित)

दीनदयाळ उपाध्याय यांच्या मते, पाश्चात्य विचारात प्रत्येक सामाजिक घटक एकमेकांना सामावून घेतात परंतु एकमेकांपासून अविभाज्य असतात. त्यामुळे प्रत्येक घटकाची हित जाणीव भिन्न भिन्न असते.परिणामी त्यांच्यात हितसंबंधांचा संघर्ष आणि हुकूमशाही निर्माण होते. उलट भारतीय विचार एकात्म मानवतावादी किंवा भारतीय जीवन निर्मिती ही व्यक्ती आणि समाजाच्या विविध घटकांमधील भिन्नता स्वीकारते. सामाजिक जाणीवांची भावना परस्परावलंबातून विकसित झालेले आहे, ही परस्परावलंबातून निर्माण झालेली विकसित झालेली सामाजिक जाणीव हितसंबंधांचा संघर्ष नसून उलट पूरक आणि समन्वयक आहे. मानवी जीवनाच्या मूळ उद्देशाची उत्क्रांती ही मानव जातीच्या गुंतागुंतीच्या किंवा चक्रीय जीवनातूनच झाली आहे. त्यामुळे व्यक्तीचे आणि मानव जातीचे हितसंबंध परस्परविरोधी किंवा संघर्षमय असू शकत नाहीत.

दीनदयाळ उपाध्याय यांच्या मते, व्यक्तीपासून मानवतेपर्यंत होणारी चेतनेची उत्क्रांती ही एक मानवी प्रक्रिया आहे. जी सांस्कृतिक आहे. तर पाश्चात्य विचारांमध्ये निर्जीव वस्तूंना कृत्रिम प्रणालीशी जोडण्याची प्रक्रिया अशा प्रणालीवादाकडे नेते की ज्याला अंतिमतः राष्ट्रवाद म्हणून घोषित केले जाते. शरीराचे यांत्रिक स्वरूप मानवाच्या नैसर्गिक संवेदनशीलतेला धक्का पोहोचवते. मूर्त जीवन (पाश्चात्य जीवन) विखंडित मानवाची प्रतिनिधित्व करते तर अखंड वर्तुळाकार संरचना ही एकसंघ मानवाचे प्रतिनिधित्व करते. हे पुढील आकृतीतून उपाध्याय यांनी स्पष्ट केले आहे.




सर्पिल प्रणाली आकृती [4] - राहुल कुमार (2024) एकात्म मानवतावाद आधारित (भारतीय विचारसरणी)

दीनदयाळ उपाध्याय यांचा जातीव्यवस्थेवरती विश्वास नव्हता. मनुष्य आणि समाजाचे सर्व घटक, मनुष्य आणि समाज, समाज आणि मनुष्य यांना जोडणाऱ्या प्रक्रिया यांच्या गतिशीलतेतून संबंध विकसित होत असतात. या तत्त्वावरती एकात्म मानवतावाद आधारलेला आहे. आपल्याकडील जात व्यवस्था ही कोणीतरी दुसऱ्यांचे काहीतरी हिसकावून घेण्यासाठी व स्वतःची जात प्रस्थापित करणे हा हेतू होता. अशी जातीव्यवस्थेवरती टीका करतात.

दीनदयाळ उपाध्याय यांच्या मते, माणसाला शरीर,मन बुद्धी आणि आत्मा यांच्या सुखाची गरज असते. शरीर, मन आणि बुद्धी यांच्या संयोगातून माणूस घडतो. मनुष्याला शरीर, मन, बुद्धी आत्मा यातून जे सुख प्राप्त होते तेच मनुष्याचे सुख असते केवळ एकाचा विचार करून चालत नाही, तो अपूर्ण विचार असतो. आपण एखाद्या व्यक्तीचा विचार करताना या चौघांचा विचार केला पाहिजे. त्याचप्रमाणे समाजाने समूहाचा देखील विचार केला पाहिजे. व्यक्तीच्या समूहाला म्हणजे समाजाला देखील शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा या चार बाबी असतात.

ज्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीमध्ये शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांचा समावेश असतो. त्याचप्रमाणे सामूहिक मनात कितीही लोक असले तरी एकच शरीर, एकत्र राहण्याची इच्छा म्हणजेच मन, एकच अवस्था म्हणजे बुद्धी, आणि एकच आदर्श म्हणजेच आत्मा शिल्लक राहतो.

समष्टी किंवा समूहाचा विचार करताना देखील या चार बाबींचा विचार करायला हवा कारण समूहाला देखील शरीर,मन, बुद्धी व आत्मा असतो. ज्याप्रमाणे एका शरीरामध्ये शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा त्याचप्रमाणे समाजात (समष्टीमध्ये) व्यक्ती म्हणजे शरीर, एकत्र राहण्याची इच्छा म्हणजे मन, एक व्यवस्था म्हणजे बुद्धी, एक आदर्श म्हणजे आत्मा असतो. आजच्या कालखंडात सर्वात मोठा समष्टीचा घटक म्हणजे राष्ट्र होय. राष्ट्राच्या दृष्टीने विचार केला तर राष्ट्रासाठी चार घटक आवश्यक असतात.


1) देश-देश हा भूमी व लोकसंख्या या माध्यमातून देश बनतो, केवळ भूमी म्हणजे देश नाही. एखाद्या भूमीवर जेव्हा लोक राहतात व ते भूमीला माता मानतात तेव्हाच तो देश मानला जातो

2) इच्छाशक्ती- सामूहिक जीवन जगण्याचा दृढ निश्चय म्हणजेच इच्छाशक्ती होय.

3) नियम किंवा संविधान-तिसरी व्यवस्था म्हणजे नियम किंवा संविधान होय. नियमानाचा समुच्चय म्हणजे संविधान होय. (असा इथे अर्थ पंडित दीनदयाला उपाध्याय यांना अपेक्षित आहे.)

4) जीवन आदर्श-जीवन आदर्श म्हणजे संस्कृती,

देश, संकल्प, धर्म, आदर्श या चार साधनांच्या आधारे राष्ट्र निर्मिती होते अशी भूमिका उपाध्याय घेतात.





आकृती - एकात्म मानवदर्शन- मानव व समाज समन्वय [5] दीनदयाळ उपाध्याय (2014) पृष्ठ क्र.25

ज्याप्रमाणे व्यक्ती शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांनी बनलेली असते, त्याचप्रमाणे समूह सार्वजनिक संकल्प, धर्म आणि आदर्श यांनी बनलेला असतो. अशाप्रकारे, हे दोन घटक तयार होतात. हे दोन घटक एकमेकांशी जोडलेले आहेत. भारतीय जीवनदर्शनानुसार, व्यक्ती आणि समाज यांच्यात कोणताही संघर्ष नाही. एक दुसऱ्याशिवाय अस्तित्वात राहू शकत नाही. व्यक्ती आणि समाज नेहमीच एकत्र नांदतील. या दोन्हींच्या संयोगाने तयार झालेल्या चार गोष्टींना पुरुषार्थ म्हणतात. अर्थ, धर्म, काम आणि मोक्ष हे चार आधारस्तंभ केवळ व्यक्तीचेच नाहीत, तर समाजाचे किंवा राष्ट्राचेही आहेत.

अर्थ आणि धर्म, जरी एकमेकांच्या विरुद्ध असले तरी, ते एकमेकांचे आधार आहेत. अर्थाला त्याची शक्ती धर्मातून मिळते. अर्थामध्ये दंडविषयक धोरण, राज्य आणि शेती यांचा समावेश होतो. अर्थाच्या अनुपस्थितीतही धर्म नाहीसा होतो. अशाप्रकारे, दोघेही एकमेकांचे पोषण करतात. यानंतर, कामाची पूर्तता करण्यासाठी काम येते. अर्थामध्ये आपण कामाची पूर्तता करतो, परंतु काम हे अर्थ आणि धर्म यांच्यामध्ये येते.

दीनदयाळ उपाध्याय यांच्या मते,"ज्याप्रमाणे धर्म आणि अर्थ, परस्परविरोधी असूनही, एकमेकांचा आधार आहेत, त्याचप्रमाणे काम आणि मोक्ष, परस्परविरोधी असूनही, एकमेकांचा आधार आहेत. सर्वात मोठी इच्छा मोक्ष आहे, आणि कामासाठी मोक्ष आवश्यक आहे. अशाप्रकारे, या चार तत्त्वांच्या आधारे, आपण परिपूर्ण जीवनाची इच्छा पुढे नेऊ शकतो. हे सर्व मिळून एक घन तयार करतात. केवळ हे सर्व मिळूनच परिपूर्णता निर्माण करतात. जर तुम्ही परिपूर्णातून परिपूर्णता बाहेर काढली, तर फक्त परिपूर्णताच शिल्लक राहील. ती कधीही अपूर्ण असू शकत नाही." ती लहान असू शकते."[6] दुबे अजय कुमार (2014) पृष्ठ क्र.214

दीनदयाळ उपाध्याय यांच्या मते, जर आत्म्याचे प्रेम नसेल किंवा ते कमी असेल, तर समाजाला आवश्यक असलेले योगाचे प्रेम शक्य होणार नाही. जर योगाचे प्रेम कमी असेल, तर आत्मा आवश्यकतेनुसार साधना करू शकणार नाही. जर आत्म्याने पुरेशी साधना केली नाही, तर समाजही पुरेसे शिक्षण देऊ शकणार नाही. म्हणून, योगाचे प्रेम, योग आणि शिकवण, हे सर्व योग्य प्रमाणात असले पाहिजे.




आकृती- एकात्म मानवतावादाचे दर्शन, [7] दीनदयाळ उपाध्याय (2014) पृष्ठ क्र.30

जेव्हा माणूस जन्माला येतो, तेव्हा त्याचे संपूर्ण आयुष्य समाजावर अवलंबून असते. समाज शिक्षणाच्या माध्यमातून माणसाला घडवतो. जर माणसाला समाजाकडून शिक्षण किंवा संस्कृती मिळाली नाही, तर तो माणूस म्हणून दिसत नाही. दीनदयाळजी म्हणतात, "शिक्षणच माणूस आणि समाजाला एकत्र आणते. माणूस त्याच्या आई-वडिलांनी, शिक्षकांनी इत्यादींनी शिकवल्याप्रमाणे काम करू लागतो." तो समाजासाठी काम करतो. सर्वसामान्य लोकांना वाटते की तो स्वतःसाठी काम करतो. पण प्रत्यक्षात तसे नसते. तो कामाच्या माध्यमातून समाजाशी जोडला जातो. [8] दीनदयाळ उपाध्याय (2014) पृष्ठ क्र.३८.

दीनदयाळ उपाध्याय यांच्या मते, माणूस जे काही काम करतो ते समाजासाठीच करतो, समाजाला त्याच्या योगदानाची पर्वा असते. समाजानेच आम्हाला शिक्षण दिले आणि कापड विणायला शिकवले. आम्ही जे काही कापड विणतो, ते सर्व आम्ही स्वतः घालत नाही, आम्ही ते समाजाला देतो. पूर्वी आपल्या देशात हे सर्व काम सेवा म्हणून केले जात असे. त्याचे मूल्य पैशात मोजले जात नव्हते. सेवा करणे हाच आमचा धर्म आहे. गीतेतही आपल्याला निस्वार्थ कार्य करण्यास सांगितले आहे. देवाने म्हटले आहे, "मला सर्व काही द्या, मी तुमच्या योगप्रेमाचा विचार करीन, मी योगातच आहे."...

दीनदयाळ उपाध्याय यांच्या मते, "पश्चिमेत 'जो कमावतो तोच खातो' ही जी घोषणा दिली जाते, ती बरोबर नाही. लहान मुले आणि रुग्ण कमवत नाहीत. तरीही, जो जिवंत आहे तो खातो. तो खाणारच. कमाई (काम) आणि मजुरी (जझरमिक) यांचा अर्थ पश्चिमेत आहे. इथे ते आमच्यासाठी केले जात नाही, कारण तो आमचा धर्म आहे." कामाद्वारे आपण आपले जीवन आत्म्याला प्रकट करतो. शेतकरी शेतीतून आपले जीवन प्रकट करतो; हेच त्याचे जीवन आहे. सर्व शेतीची कामे श्वासाप्रमाणे शेतकऱ्याच्या जीवनाशी जोडलेली आहेत. तो कामाच्या आधारावर जगतो. माणूस कामामुळे जगतो, पण त्याचा संबंध कामाच्या मोबदल्याशी नसतो. [9] दीनदयाळ उपाध्याय (2014) , पृ. ३४-३५.

दीनदयाळजींच्या मते, "आपल्या कामाला आपले कर्तव्य माना, योगावरील आपले प्रेम आपोआपच पुढे जाईल, हे समाजाच्या नैसर्गिक स्थितीत शक्य होईल."[10] दीनदयाळ उपाध्याय (2014) पृष्ठ क्र.30

भारतीय संस्कृतीत त्यागाची तरतूद आहे. समाजात आपल्याला प्रेमापोटी किंवा आनंदासाठी काही दिले गेले, तर आपण म्हणतो, "...च्या भल्यासाठी काहीतरी वाचवून ठेवा." कारण त्यात फळांची आणि पुढच्या पिढीची काळजी असते.

दीनदयाळ यांचा असा विश्वास होता की, प्रत्येक व्यक्तीच्या उदरनिर्वाहाची सोय करणे, त्याला शिक्षित करणे, समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून योगदान देण्यास व स्वतःचा विकास करण्यास सक्षम करणे, तो सक्षम आणि पात्र असेल तेव्हा त्याच्या उपजीविकेची सोय करणे, आणि जर कोणत्याही कारणास्तव ते शक्य नसेल तर, त्याच्या उदरनिर्वाहाची व पुरेशा साधनसंपत्तीची तरतूद करणे ही समाजाची जबाबदारी आहे. प्रत्येक खरा समाज कोणत्या ना कोणत्या स्वरूपात याचे पालन करतो. हाच प्रगतीचा मुख्य निकष आहे. म्हणून, आपण किमान जीवनमान, शिक्षण, उपजीविकेचा रोजगार, सामाजिक सुरक्षा आणि कल्याण यांची हमी हे मूलभूत हक्क म्हणून स्वीकारले पाहिजे.[11] दीनदयाळ उपाध्याय (2014) पृ. ३६.

दीनदयाळ उपाध्याय यांच्या मते, भारताच्या स्वातंत्र्यानंतर, देशातील राजकीय पक्ष पक्षपाती विचारांनी काम करत होते. ते कोणत्या ना कोणत्या राजकीय विचारधारेशी निगडित असून केवळ इतर पक्षांची नक्कल आहेत. ते भारताची दूरदृष्टी साकार करू शकत नाहीत, तसेच एका महत्त्वाच्या वळणावर उभ्या असलेल्या जगाला मार्गदर्शनही करू शकत नाहीत.

जर आपण आजच्या अनेक आर्थिक आणि सामाजिक कायद्यांचे परीक्षण केले, तर आपल्याला आढळून येईल की ते आपल्या सांस्कृतिक जाणिवेच्या अस्तित्वावर आधारित आहेत. याची कारणे म्हणजे काळानुसार होणारे बदल आणि बदलाचा अभाव, परिस्थितीशी संघर्ष निर्माण झाल्यावर त्यातून उद्भवणाऱ्या मागण्यांची पूर्तता करण्यासाठी अवलंबलेले उपाय, किंवा परिस्थितीने लादलेल्या व्यवस्था या केवळ त्यांचे अनुकरण करून स्वीकारलेल्या व्यवस्था आहेत.

**संशोधन पत्रिकेच्या मर्यादा-** पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेल्या एकात्म मानवतावाद विचारसरणीचे पुरेशा प्रमाणात विश्लेषण होऊ शकलेले नाही. एकात्म मानवतावादातील शिक्षण पद्धतीचे विश्लेषण सदर संशोधन पेपर मध्ये झालेले नाही.

**निष्कर्ष-** दीनदयाळ उपाध्याय यांचा एकात्मिक मानव विचार हा भारतीय व भारताबाहेरील सर्व विचार प्रवाहांचे मूल्यांकन करून स्वतःची स्वतंत्र विचारसरणी विकसित करतो. एकात्मिक मानवतावादाच्या आधारे म्हणजेच भारतीयत्व विचाराच्या आधारे राष्ट्र प्रगतीकडे कसे जाईल यासंबंधीचे विचार दीनदयाळ उपाध्याय मांडतात. आधुनिक विचार प्रवाहांमध्ये तसेच राष्ट्राच्या प्रगतीमध्ये एकात्म मानवतावाद विचार योगदान देऊ शकेल अशी मांडणी दीनदयाळ उपाध्याय करतात. पाश्चिमात्य राष्ट्रवाद संकल्पना भारतीय प्रगतीसाठी योग्य नाही भारतीय राष्ट्रवादाची मांडणी एकात्म मानवतावाद विचाराच्या

आधारे दीनदयाळ उपाध्याय करतात. दीनदयाळ उपाध्याय हे 'एकमत मानववाद' भारतीयत्वाचे सार आहे,अशी भूमिका घेतात.

एकात्म मानवतावाद विचारसरणीच्या आधारे भारतीय संस्कृती व प्रतिष्ठा या आधारावरती राजकीय, सामाजिक, आर्थिक लोकशाही राष्ट्र बनविण्यासाठी प्रेरणा देते. प्रत्येक व्यक्तीला समान संधी व स्वातंत्र्य देण्याची हमी एकात्म मानवतावाद देते. जगाच्या पाठीवरती एक प्रगतशील आधुनिक जागरूक राष्ट्र निर्माण होऊन इतर राष्ट्रांच्या सामर्थ्याचा यशस्वीपणे सामना करेल व जागतिक शांतता प्रस्थापित करण्याची प्रेरणा देते.

एकात्म मानवतावाद विचारसरणी राष्ट्र बलवान निर्माण होण्याच्या दृष्टिकोनातून विश्लेषण अपुरे करते, तसेच संकल्पनांचे विश्लेषण पूर्णपणे करण्यात आलेले नाही. जसे की संघटनात्मक बांधणीमध्ये व्यक्ती स्वातंत्र्य आहे किंवा नाही ? धर्म संकल्पना स्पष्टपणे मांडली नाही. औद्योगिकरण व जागतिक अर्थव्यवस्था राष्ट्र निर्माण मध्ये काय स्थान आहे याचे विश्लेषण केलेले नाही.

**संदर्भ-**

1) सुमंत यशवंत, विचारसरणीच्या विश्वात, युनिक फाउंडेशन, पुणे 2018 पृष्ठ क्र.15

2) दीनदयाल उपाध्याय, "एकतारी मानवतावाद (तात्विक सिद्धांत, विश्लेषण)", नवी दिल्ली: भारत प्रकाशन, पृ.39.

3) राहुल कुमार (2024) पंडित दीनदयाळ उपाध्याय के एकात्म मानवतावाद एवं शैक्षिक दर्शन का विश्लेषणात्मक अध्ययन, (अप्रकाशित Ph.D. thesis)

4) कित्ता पृष्ठ क्रमांक 312

5) दीनदयाल उपाध्याय, "एकतारी मानवतावाद (तात्विक सिद्धांत, विश्लेषण)", नवी दिल्ली: भारत प्रकाशन, पृ. क्र.25

6) दुबे अजय कुमार (2014) पंडित दीनदळ उपाध्याय के मानवतावादी दर्शन की वर्तमान में प्रासंगिकता, शोध अमृत,4(4) 212 ते 215

7) दीनदयाल उपाध्याय, "एकतारी मानवतावाद (तात्विक सिद्धांत, विश्लेषण)", नवी दिल्ली: भारत प्रकाशन, पृ. क्र.30

8) कित्ता पृष्ठ क्र. 38

9) कित्ता पृष्ठ क्र. 39-40

10) कित्ता पृष्ठ क्र.30

11) कित्ता पृष्ठ क्र.36